Department of Agriculture
Government of Maharashtra

The World bank assisted

# Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# खरीप पिकांसाठी शेतमालाच्या संभाव्य किमतींचा अहवाल

# (२०२३-२४)


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी


**जुलै -२०२३**

**बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष** **जुलै -२०२३**


**मका** हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात मागील वर्षांच्या तुलनेत ६ टक्के मक्याचे उत्पादन कमी होण्याच्या अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मका निर्यात २०२१-२२ मध्ये ३४ लाख टन झाली होती त्यामध्ये चालू वर्षी २०२२-२३ मध्ये ६ लाख टनांची वाढ होऊन ती ४० लाख टन होईल असा अंदाज आहे.





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या ३ अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२२-२३ या वर्षी मक्याच्या उत्पादनात ६.५ टक्के वाढ होईल असा अंदाज आहे.




१ एप्रिल ते ३० जून २०२३ या कालावधीत भारतात मक्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत ४६ टक्के जास्त झाली.




महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२२-२३ या वर्षी मक्याच्या उत्पादनात २४ टक्के वाढ होईल असा अंदाज आहे त्यामध्ये मुख्यतः खरिपात मका उत्पादन सुमारे १४ टक्क्यांनी जास्त असेल, मात्र प्रतिकूल हवामानामुळे भारतातील गेल्या वर्षीच्या तुलनेत रब्बीमध्ये उतपादन २.४ टक्के कमी




मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.


२०२०- रुपये १२५३ प्रति क्विंटल
२०२१- रुपये १५२७ प्रति क्विंटल
२०२२-रुपये १८७७ प्रति क्विंटल

खरीप हंगाम २०२३-२४ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. २०९० प्रति क्विं. इतकी आहे.


**ऑक्टो ते डिसें २०२३ महिन्यासाठी मक्याचे किंमत अंदाज पुढील प्रमाणे**
**रुपये १६०० ते २१०० क्विंटल**

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष** **जुलै २०२३**


**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे. विदेशी व्यापार महासंचालनालय (DGFT) ने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तूरीसाठीचे -मुक्त आयात धोरण मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आले आहे.




डिसेंबर ते एप्रिल हा तुरीचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष जून २०२२-२३ मधील तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत थोडी कमी झालेली दिसून येत आहे. जून २०२३ मध्ये ती ६.३ लाख टन इतकि आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत ८.९५ लाख टन इतकी होती





तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२२-२३ मध्ये तुरीचे उत्पादन सुमारे ३६.६६ लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी कमी असल्याचे दिसून येते तसेच महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन १६.५ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ८.५ लाख टनांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे.




जून २०२२ पासून तुरीच्या किंमती वाढत आहेत. गतवर्षीच्या दरापेक्षा चालू वर्षी तुरीचे भाव जास्त आहेत.मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील तुरीच्या जानेवारी ते मार्च मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| जाने ते मार्च २०२०: | रु. ६,४९८/क्विंटल |
| जाने ते मार्च २०२१: | रु. ६,३१०/क्विंटल |
| जाने ते मार्च २०२२: | रु. ७,७३५/क्विंटल |

सध्याच्या हंगामासाठी सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु. ६६००/क्विंटल) सध्याच्या तुरीच्या किंमती जास्त आहेत.





मागील वर्ष २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये आयात आणि निर्यात दोन्ही वाढले आहेत.

## जानेवारी ते मार्च २०२४ साठी संभाव्य किमतीचा अंदाज


रु. ६८०० ते ७५०० /क्विं

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — जुलै २०२३


**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत





भारतात सन २०२३-२४ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२० लाख टन होण्याची शक्यता वर्तावली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत सारखेच आहे. ( स्त्रोत: WASDE, USDA)





अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, जून- २०२३) अहवालानुसार सन २०२३-२४ मध्ये, जगात ४१०५ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ११ टक्केनी (३६९५ लाख टन, २०२२-२३) अधिक आहे.





सन २०२२-२३ मध्ये सोयामीलच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. स्त्रोत: SEA अहवाल जून२०२३




चालू वर्षी नोव्हेंबर २०२२ ते एप्रिल २०२३ या कालावधीत १७.२५ लाख टन सोयातेल आयात केले आहे, मागील वर्षीच्या तुलनेत याच कालावधीपेक्षा कमी आहे . (स्रोत: SEA अहवाल,




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात सोयाबीनची मासिक बाजारात आवक जास्त आहे. ( स्त्रोत: Agmarknet)




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनच्या किंमती कमी आहेत. ( स्त्रोत: Agmarknet)

मागील तीन वर्षातील ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:

ऑक्टो ते डिसें. २०२०: रु. ३९६४ प्रती क्विंटल.
ऑक्टो ते डिसें. २०२१: रु. ५९८० प्रती क्विंटल.
ऑक्टो ते डिसें. २०२२ : रु. ५४२५ प्रती क्विंटल.
सध्याच्या किंमती या खरीप २०२२-२३ हंगामासाठी जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमती (रु.४३००) पेक्षा जास्त आहेत.
सन २०२३-२४ हंगामासाठी किमान आधारभूत किंमत रु. ४६०० प्रती क्विंटल आहे.


**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ साठी संभाव्य किमतींचा अंदाज-**
**रु. ४८०० ते ५२०० प्रती क्विं.**

सदर संभाव्य किंमत अंदाज हा FAQ ग्रेडच्या सोयाबीनसाठी आहे.


**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष** **जुलै २०२३**

# कापूस


कापूस हे भारतातील सर्वात महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी25% वाट भारताचा आहे आहे.





गेल्या वर्षी 14 वर्षांमधील नीचांकी उत्पादनावर गेल्यानंतर, भारतातील कापूस पीक 337 लाख गाठी म्हणजे गेल्या वर्षीच्या उत्पादनाच्या तुलनेत 26 लाख गाठींनी जास्त असल्याचा अंदाज आहे.





2023-24 मध्ये जागतिक कापूस उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत किरकोळ वाढण्याची अपेक्षा आहे (0.5 टक्के किंवा 600,000 गाठी) ते 115.0 दशलक्ष गाठी युनायटेड स्टेट्समध्ये जास्त उत्पादनाची अपेक्षा तसेच चीन, तुर्कस्तान आणि पाकिस्तान मध्ये कमी उत्पादनाचा अंदाज आहे. (स्रोत:USDA –Cotton Outlook)




राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत , मागील वर्षाच्या तुलनेत 2022-23 मध्ये आयातीत 55% वाढ आणि निर्यातीत 23% घट होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक पातळीवर दिसला असून मागील वर्षीच्या तुलनेत आयातीत 3.84% वाढ आणि निर्यातीत 1.81% घट झाली आहे.




मार्च महिन्यात बाजारात कापसाची आवक गतवर्षीप्रमाणेच असल्याचे दिसून येत आहे.




गेल्या चार महिन्यांपासून अकोला बाजारपेठेत कापसाचे भाव थोडे कमी होत आहेत. मागील तीन वर्षातील ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीतील कापसाच्या किमती पुढील प्रमाणे

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० - रु ५२५७ प्रति क्विंटल

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ – रु ७९३९ प्रति क्विंटल

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ – रु ८७६२ प्रति क्विंटल

**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीसाठी कापसाच्या किमती अंदाजे रु. ७५०० ते ८५०० प्रति क्विंटल**

टीप: *सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा*

अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे**

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग,

सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६

फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री: १८०० २१० १७७०, ई-मेल: mirmc.smart@gmail.com

वेबसाईट: https://www.smart-mh.org